रजि.नं.ए.एन.आर./पी.आर.डी./ए.२७० स्थापना दि. १२ नोव्हेंबर १९७७

**संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित,संगमनेर**

मु.घुलेवाडी (अमृतनगर) पो.संगमनेर एस.के.(४२२ ६०८) ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर

फोन व फॅक्स (०२४२५)२२५४१०,२२५५१०,२२६१६१,२२६१६२

---

जा.क्र.संगमनेर दूध /एच.आर/मजुर पुरविणे/१८७/२०२५-२६ दि.२१/४/२०२५

आमचे दुध संघाचे दुध पॅकिंग विभागात पॅकिंग डॉक वरील दुध पॅकिंगची व तद्नुषंगिक काम प्रति लिटर बेसिसवर दयावयाचे आहे.आपणांस नियमाप्रमाणे लेबर पुरवठा करणेसाठी मा.सहाय्यक लेबर कमिशनर अहिल्यानगर यांचेकडील लायन्सस, जी.एस.टी,व पी.एफ.नंबर सादर करणे आवश्यक आहे.सदरचे कामे खालील शर्ती व अटीवर देण्यात येणार आहे.

## दुध पॅकिंग विभागातील कामाचा तपशिल

१) **चैनवर क्रेट देणे-** दुध पॅकिंग डॉक वर पॅकिंगचे काम ऑनलाईन असल्याने एका वेळेस २ अन लोडींग चैन वर स्वच्छ व धुतलेले रिकामे क्रेट दुध पॅकिंग पिशव्या भरणेसाठी अनलोडींग चैन वर ठेवणे.

२) **दुध पिशव्या क्रेट मध्ये भरणे-**पॅकिंग मशिन मधुन बाहेर पडणाऱ्या दुधाच्या व ताकाच्या पिशव्या मोजुन क्रेट मधे भरणे व क्रेट लोडींग चेनवर ठेवणे.

३) **बर्फ फोडणे व मारणे-**दुध पॅकिंगचे काम ऑनलाईन चालत असल्याने ताबडतोब बर्फ फोडुन दुधाच्या पिशव्या भरलेल्या प्रत्येक क्रेटला बर्फ मारून वाहिकेत लोडींग साठी पुढे पाठविणे.

४) **क्रेट वळविणे-**एका वेळेस ३ वाहिका लोड होत असलेमुळे दुध वाहिकेत क्रेटस् लोड होत असताना क्रेटचे चिठ्ठी प्रमाणे त्या त्या वाहिकेत क्रेट लोडींगसाठी चैनवरून पाठविणे.

५) **दुग्ध वाहिका लोडींग करणे-**दुध पॅकिंग डॉकला एका वेळेस ३ दुध वाहिका लोडींगसाठी उभ्या राहतात त्या प्रत्येक वाहिकेत बिल,वितरण चलन,गेटपास व चिठ्ठी प्रमाणे २०० मिली.२५० मिली,५०० मिली व १००० मि.लि.चे वर्गीकरणा नुसार क्रेटस् वाहिकेत लोड करणे.

६) **रिकामे क्रेट खाली करणे** - दुध वितरण मार्गावरून रिकामे क्रेट घेऊन आलेल्या दुध वाहिकेतील रिकामे क्रेट डॉकवर खाली करणे.सदर क्रेट,क्रेट वॉशर पर्यंत नेणे व त्यांची थप्पी लावणे.तसेच वाहिकेत आलेले बदली क्रेट,तुटलेले क्रेट तपासणे.इ.

७) **क्रेट वॉशर वरिल कामे-** पॅकिंग डॉकवर रिकामे क्रेट स्वच्छ करणे,घासणे,क्रेट मधील कचरा गोळा करणे तसेच क्रेट वॉशर मधुन क्रेट स्वच्छ करून त्यांची थप्पी मारणे.

८) **लिकेज फोडणे-**पॅकिंग चालु असताना मशिन फॉल्ट,वजन कमी अथवा जादा,साईज तफावत,होल्टेज तफावत व मार्गावरून वितरकांनी परत केलेले दुध इ.कारणास्तव दुधाच्या पिशव्या लिकेज असतात.त्या मशिन व्दारे डॉक वरती वेळेत फोडणे.

९) **वेस्टेज पॉलिथीनची वाहतुक करणे-**फोडलेल्या लिकेज दुधाच्या पिशव्या स्वच्छ धुणे,वाळविणे,तसेच स्वच्छ झालेले पॉलिथीन वाहुन नेवुन कंपाऊंडमध्ये टाकणे.व इतर पॅकिंग संबंधीत अनुषांगिक कामे करणे.

१०) **साफ सफाई करणे** -दुध पॅकिंग विभाग व परिसरातील दोन वेळेस साफ सफाई करणे बंधनकारक राहील.

११) **वाहिका लोडींग करणे-**दुध पॅकिंग डॉकवर वाहतुक व दुध पॅकिंग विभागाने ठरवुन दिलेल्या वेळेप्रमाणे वाहिका तुमचे लोडर कडुन ३ पॉईंटवर लोड करणे.

पान नं.२ वर

# शर्ती व अटी

उपरोक्त कामासाठी दुध पॅकिंग डॉकवरील व इत्तर तद्नुषंगिक कामे करणे करिता मजुरांचा पुरवठा करणे कामी एकुण मजुरीचा दर प्रति लिटर तुम्ही कबुल केलेप्रमाणे व संघाचे मा.संचालक मंडळाचे सभेत ठरलेप्रमाणे राहिल.

१) सदर कामाची वर्क ऑर्डर सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी असुन ते काम चालु झाल्याच्या तारखे पासुन ते काम संपे पर्यतच्या कालावधी पर्यंत आस्थित्वात राहिल.

२) वरील काम तुम्हास नियमित व वेळेवर करावे लागेल.त्यासाठी तुम्हास कमीतकमी रात्रपाळीत ४० व दिवस पाळीत ३० मजुर कामावर ठेवावे लागतील.शिफ्ट मध्ये मजुर कमी राहील्याने कामात अडचण आल्यास मजुर संख्येनुसार प्रति मजुर रक्कम रू ६००/-दंड म्हणुन कपात केली जाईल.कपात केलेली रक्कमेची परत मागणी करता येणार नाही.

३) तुमचे मजुरांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी शिफ्टनुसार २ सुपरवायझर ठेवावे लागतील.

४) तुम्ही संघाकडे बिल सादर करावयाचे असुन संघाकडुन तुम्हास दरमहा लिटर बेसिसनुसार बिल अदा केले जाईल.

५) तुमचे दरमहा बिलातुन प्रति लि.०.०५ पैसा रक्कम बिनव्याजी डिपॉझीट म्हणुन कपात केली जाईल.अशी कपात केलेली रक्कम तुम्हास वर्षा अखेरीस परत केली जाईल.

६) शासन नियमा प्रमाणे तुमचे होणाऱ्या बिल रक्कमेतुन टी.डी.एस.ची रक्कम कपात करणेत येईल.

७) प्रॉ.फंड कायद्यातील तरतुदी प्रमाणे तुम्हास तुमचे कामगारांचा दरमहा प्रॉ.फंड कपात करून त्या रक्कमेचा भरणा केल्याचे स्टेटमेन्ट/चलन संघाकडे दरमहा सादर करावे लागेल.

८) सदर कामापोटी सिक्युरीटी डिपॉझीट म्हणुन तुम्हास रू.२,००,०००/-रक्कम संघाकडे ठेवावी लागेल.डिपॉझीट रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम ॲग्रीमेंट पुर्ण झाल्यानंतर परत दिली जाईल.

९) आपले काम असमाधानकारक वाटल्यास अथवा आपण अर्धवट काम सोडुन दिल्यास सदर काम दुसऱ्या ठेकेदाराकडुन अथवा पर्यायी व्यवस्था करून करणेत येईल.त्यासाठी येणारा खर्च आपणा कडुन वसुल केला जाईल.तसेच डिपाझीट व सिक्युरीटी डिपाझीट रक्कम जप्त केली जाईल.

१०) कामावर असताना आपल्या मजुरांना काही अपघात किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमचे वर राहील.अथवा दुर्दवी मृत्यु झाल्यास त्याची नुकसान भरपाई रक्कम देण्याची सर्वस्वी जबाबदारी तुमची राहिल.त्याची तोषिस संघास देणार नाही.तसेच मजुरांचे सुरक्षिततेसाठी प्रत्येक मजुराचा अपघात विमा घ्यावा लागेल.

११) तुमचे मजुरांना आवश्यकता भासल्यास उपलब्धते नुसार ॲग्रीमेन्ट कालावधी मध्ये तुम्हांस दुध संघ आवारात राहण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात विनामुल्य खोल्या/शेड उपलब्ध करून देण्यात येतील,परंतु खोल्या/शेड देणे संघास बंधनकारक राहणार नाही.

१२) मजुरांना राहण्यासाठी दिलेल्या शेड तुमचा करार संपले नंतर संघास त्वरीत खाली करून द्याव्या लागतील.

१३) ठरवुन दिलेले मजुरी दर प्रति लि.प्रमाणे असुन सद्याच्या प्रतिदिनी १,५०,००० लि.दुध पॅकिंग पेक्षा १०% पॅकिंगमध्ये वाढ झाल्यास ०.०१ पैसा कमी करणेत येईल व जर दुध पॅकिग १०% पेक्षा कमी झाल्यास ०.०१ पैसे वाढविण्यात येईल.

पान नं.३ वर

१४) तुम्ही दैनंदिन पुरवठा केलेल्या मजुरांकडुन क्रेट मध्ये दुध पिशव्या क्षमतेपेक्षा कमी/जादा भरल्यास सदर कमी /जादा गेलेल्या दुधाची किंमतीची कपात तुमचे दरमहा बिलातुन वसुल करणेत येईल.

१५) तुम्हांस कामाची वर्क ऑर्डर मिळाले पासुन २ दिवसांचे आत योग्य त्या स्टॅम्प पेपर वर करारनामा करून घ्यावा लागेल.त्या करारातील अटी व शर्ती तुमचेवर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

## पावडर,ॲक्वा,चिज व दुग्धशाळेतील विभागा करिताअटी व शर्ती

१) तुम्हांस ठरवुन दिलेप्रमाणे व एच.आर.विभागाचे मागणी प्रमाणे दैनदिन मजुरांचा पुरवठा करावा लागेल.

२) तुमचे मजुरांचे कामाची वेळ (शिफ्ट)एच.आर/टाईम ऑफिस ठरवुन देईल त्याप्रमाणे राहील.गरज भासल्यास वरिष्ठांच्या/विभाग प्रमुखांच्या आदेशानुसार तुमच्या मजुरांना इतर दुसऱ्या विभागात देखील काम करावे लागेल.

३) तुमचे मजुरांना कामावर दैनदिन टाईम ऑफिसला आलेबाबतची व सुट्टी झाल्यानंतर कामावरून जाताना नोंद करावी लागेल.

४) तुम्हाला १८ पेक्षा कमी वय असलेल्या मजुरांची नेमणुक करता येणार नाही.या शिवाय तुमचे मजुरांस काम करत असताना अपघात अगर दुर्दवी मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी तुमची राहिल.त्या साठी संघ तुम्हास कोणतीही मदत किंवा नुकसान भरपाई देणार नाही.किंवा तुम्हास संघाकडे नुकसान भरपाई रक्कम मागणी करता येणार नाही. मजुरांचे सुरक्षिततेसाठी प्रत्येक मजुराचा अपघात विमा काढणे तुमचेवर बंधनकारक राहिल.

५) तुम्ही पुरवठा केलेल्या मजुरांच्या कामात हलगर्जीपणा,अनियमितपणा अथवा गैरवर्तन आढळुन आल्यास तुमच्या कामाचा ठेका रद्द केला जाईल.

६) तुमचे मजुरावर तुम्ही स्वत: देखरेख व नियंत्रण ठेवयाचे आहे.नेमुण दिलेल्या कामा व्यतीरिक्त तुमचे कामगार इतरत्र कोणत्याही विभागात दिसणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) सदर कामासाठी तुम्हांस दैनदिन १२ तासा करीता प्रति कामगार मा.संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार मजुरी अदा करण्यात येईल.मंजुरीवर नियमाप्रमाण जी.एस.टी.रक्कम अदा केले जाईल.

८) नियमा प्रमाणे तुमचे कडुन मजुरी वरील टी.डी.एस.रक्कम होणाऱ्या बिलातुन कपात करणेत येईल.

९) तुम्ही केलेल्या कामाचे मजुरीचे बिल दरमहा ५ तारखेला संघाकडे सादर करावे लागेल.बिलाची तपासणी करून केलेल्या कामाचे मजुरी बिल संघ नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल.तुमचे काम समाधानकारक नसल्यास मजुरी अदा केली जाणार नाही.

१०) तुम्हांला मजुर पुरवठया बाबतचा अटी व शर्तीचा स्टॅम्प पेपरवर नियमानुसार करारनामा करून द्यावा लागेल.

**कार्यकारी संचालक**